net

तरुण भारत
शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०१४

# आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. किशोर अढाव डी.एससी.ने सन्मानित

तभा वृत्तसेवा
अमरावती, १६ ऑक्टोबर

महाराष्ट्र शासनाचा (२०१२-१३)चा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख डॉ. किशोर अढाव यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने गणित या विषयामध्ये डी.एस्सी. (डॉक्टर ऑफ सायन्स) देऊन सन्मानित केले आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शिक्षकांमधून ते प्रथम मानाचे मानकरी ठरले आहेत. डॉक्टर ऑफ सायन्स करिता त्यांचा संशोधनाचा विषय डार्क एनर्जी कस्मोलॉजिकल मॉडेल्स इन सर्टन थेअरिज ऑफ ग्रॅव्हिटेन हा होता.

डॉ. अढाव यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल त्यांचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर, प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, कुलसचिव प्रा. दिनेशकुमार जोशी, विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

डॉ. किशोर अढाव यांनी माध्यमिक शिक्षक म्हणून शाळेपासून शिकविण्यास सुरुवात केली आहे.

शिवाजी शिक्षण संस्थेतील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून १० वर्ष तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून १० वर्ष अशी एकूण २० वर्ष सेवा दिलेलीआहे. सेवेत असताना बी.एड. आणि एम.फिल. पूर्ण केले. तेथेच त्यांनी वर्ष १९९६ मध्ये गणितात पी.एच.डी. मिळविली. डिसेंबर १९९६ पासून ते अमरावती विद्यापीठामध्ये गणिताचे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून १८ वर्षांपासून कार्यरत आहेत. अमरावती विद्यापीठामध्ये गणिताचे पुढील संशोधन अखंड सुरू ठेवून आतापर्यंत त्यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांना एम.फिल. तसेच २४ विद्यार्थ्यांना गणितात पीएच.डी. मिळाली आहे. आजपर्यंत त्यांचे विविध संशोधनाचे एकूण १४६ लेख (रीसर्च पेपर्स) आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. वरील आंतरराष्ट्रीय संशोधनाबद्दल त्यांना तीन वेळा गौरविण्यात आलेले आहे.

डॉ. किशोर अढाव ह्यांनी त्यांचे आंतरराष्ट्रीय संशोधन इंग्लंड, फ्रांस, नेदरलॅण्ड, आर्यलॅंड, नेपाल ह्या पांच देशांमध्ये वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये सादर केले आहेत. ते आंतरराष्ट्रीय दर्ज्याच्या १९ जर्नलसचे रेफरी आहेत. त्यांनी अमरावती विद्यापीठामधील सगळ्या प्रकारच्या प्राधिकारणांवर कार्य केले आहे. या व्यतिरिक्त एनसीसीमध्ये त्यांनी मेजर म्हणून २० वर्षे कार्य केले आहे. उत्कृष्ट अधिकारी म्हणून एनसीसीने त्यांना गौरविले आहे.

डॉ. किशोर अढाव हे गेल्या १५ वर्षांपासून अमरावती येथील इंदिरा गांधी नॅशनल ओपन विद्यापीठाच्या स्टडी सेंटरचे समन्वयकसुद्धा आहे. आज त्यांचेकडे युजीसीचा ११ लाख रुपयांचा गणितामधील अल्बर्ट आईस्टाईनच्या थेअरी ऑफ रिलेक्टीव्हीटमधील मेजर रिसर्च प्रोजेक्ट सुरू आहे. सर्वात विशेष बाब म्हणजे त्यांचे नाव आतापर्यंत ६ वेळा जळगाव, सोलापूर, आरा, दरभंगा, बोधगया, औरंगाबाद येथील विद्यापीठांच्या कुलगुरू निवडीसाठी शॉर्टलिस्ट करण्यात आले आहे.